**दोन मजली घर भाडयाने देणे आहे**

शिवगंगानगर भाग २, गोविंदश्री मंगलकार्यालयाजवळ, (Block No - 124 ). तळमजल्यावर - 1 BHK, पहिला मजला- एक रूम, टॉयलेट, बाथरूम, गच्ची. वैशिष्टे - नवीन colour केलेले, Compound, security Gate etc. KLE/ IMS शाळा, डि मार्ट जवळ.

संपर्क- दयानंद माशाळकर. 9423331752.
सदानंद माशाळकर 9924148970
भाडे- 12000 डिपॉझिट- 25,000.
एजंट, ब्रोकर यांनी संपर्क करु नये.



दैनिक सोलापूर

असत्याच्या दुनियेतील सत्य शोधणारे सायं दैनिक

# कटूसत्य

किंमत ५ रुपये

Email - katusatya@gmail.com
www.katusatyanews.com



**लक्ष्मी लॉन्स मंगल कार्यालय**

फक्त ५१०००/- रु.
जेवणासह (अटी लागू)
• निसर्गरम्य हवेशिर वातावरण • पाण्याची भरपूर सोय • जेवणासाठी स्वतंत्र हॉल • वधू-वरांना स्वतंत्र रूम्सची सोय • २४ तास लाईटची सोय

**श्री स्वामी समर्थ सेवा आश्रम ट्रस्ट**
अक्कलकोट-सोलापूर एन.एच.रोड, अक्कलकोट
मो. ९३२६१५८१५१ / ८६२५००५१११



सोलापूर | RNI No . MAHMAR 2006/17624 | वर्ष १९ वे, अंक १६० वा | रविवार, दि. २६ जानेवारी २०२५ | पाने ४ | पोष्ट परवाना: - SLP/04/2023-2025 Posted at - R.M.S.Post Office SOLAPUR


## सत्ताधारी कामाला लागेनात तर विरोधकांना सूर सापडेना ?

**मुंबई (कटूसत्य वृत्त):-** राज्यात नुकत्याच झालेल्या विधानसभा निवडणुकीत महायुतीला घवघवीत यश मिळाले. त्यानंतर महायुतीचे सरकार स्थापन झाल्यापासून तीन पक्षात सर्व काही आलबेल असल्याचे दिसत नाही. 5 डिसेंबरला देवेंद्र फडणवीस यांनी मुख्यमंत्री पदाची तर एकनाथ शिंदे, अजित पवार यांनी उपमुख्यमंत्रीपदाची शपथ घेतली.

त्यानंतर 15 डिसेंबरला 39 मंत्र्यांनी शपथ घेतली. त्यानंतर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी 21 डिसेंबरला खातेवाटप केले. त्यानंतर या-ना त्या कारणावरून महायुतीमधील तीन पक्षात कुरबुरी





















## संपादकीय

# अशा वातावरणात कशी वाढणार शिक्षणाची गुणवत्ता?

कसमाजाशी संबंधित कुठलेही कार्यक्षेत्र असो, त्याची गुणवत्ता सातत्याने तपासणे गरजेचे असते. त्यातही शिक्षण संस्थांची गुणवत्ता अधिक महत्त्वाची. यासाठी केंद्र सरकारचे शिक्षण मंत्रालय दर पाच वषार्नी नॅक, एनबीए अशा राष्ट्रीय संस्थांच्या रँकिंगची घोषणा करते. यात अपेक्षित रँकिंग आले नाही की या पद्धतीला नावे ठेवण्याची प्रथा आहे. तसे पाहिले तर संस्था जी माहिती, डेटा सबमिट करतात त्यावरच गुणदान करून ही क्रमवारी ठरविली जाते. आता कुणी खोटी माहिती दिली तर त्याची तथ्यता कशी तपासणार? खास करून प्लेसमेंट, रिसर्च पब्लिकेशन यात गोलमाल असण्याची शक्यता असते. आपल्याकडील विद्यापीठात होणाऱ्या संशोधनाचा दर्जा सुमार असतो. फार कमी प्राध्यापक आंतरराष्ट्रीय दर्जेदार जर्नलमधून पेपर्स प्रसिद्ध करतात. कारण तिथे तज्ञांकडून कडक परीक्षण होते. आपल्याकडे पेपर्स प्रसिद्ध करणाऱ्या जर्नल्सचाही बाजार सुरू झाला आहे. पीएच.डीचे संशोधनही सुमार दजार्चे झाले आहे.


विद्यापीठाच्याही अनेक समस्या आहेत. बहुतेक ठिकाणी आवश्यकतेपेक्षा प्रत्यक्षात फार कमी नियमित प्राध्यापक असतात. अनेक वर्षे या रिकाम्या जागा भरल्या जात नाहीत. आयआयटीसारख्या संस्था, सरकारी महाविद्यालयेही याला अपवाद नाहीत. कारण जाहिरात काढायला, नियुक्त्या करायला सरकारच्या परवानग्या मिळत नाहीत. कंत्राटी प्राध्यापकांच्या भरवशावर कसेतरी शिक्षण दिले जाते. अगदी परीक्षेच्या कामासाठीदेखील अर्हताप्राप्त प्राध्यापक उपलब्ध नसतात. वषार्नुवर्षे एकच प्राध्यापक असलेले विभाग विद्यापीठात आहेत. अध्ययनच नीट होणार नसेल तर संशोधन कोण, कसे करणार?

विज्ञान तंत्रज्ञान विभागासाठी उत्तम आधुनिक प्रयोगशाळा लागतात. आजकाल अनेक उपकरणाची किंमत कितीतरी लाखात असते. विद्यापीठाच्या तुटपुंज्या संशोधन तरतुदीमध्ये हे शक्य नसते. विना अनुदानित महाविद्यालयातील प्रयोगशाळांची स्थिती अत्यंत केविलवाणी असते. विद्यार्थ्यांना प्रयोग न करताच उत्तीर्ण केले जाते. शिक्षण संस्थांतील एकूणच वातावरण अध्ययन, अध्यापन, संशोधन यासाठी पोषक नसल्याने विद्यार्थी वर्गात येतच नाहीत. वेगवेगळी प्रकरणे बाहेर काढण्यात अग्रेसर असलेल्या माध्यमांनी अचानक धडक देऊन या रिकाम्या वर्गाचे चित्रीकरण दाखवले पाहिजे. म्हणजे उच्च शिक्षण कुठल्या दिशेने चालले आहे याची सर्वांनाच कल्पना येईल. असेच परीक्षण ग्रंथालयात धूळ खात पडलेल्या पीएच. डी. प्रबंधाचेदेखील करावे. म्हणजे रँकिंग, गुणवत्ता राहिली बाजूला प्रत्यक्षात नेमके कसे, किती शिक्षण, संशोधन चालले आहे याची कल्पना येईल. यात एकट्या कुलगुरूंना जबाबदार धरता येणार नाही. यात विद्यार्थी, पालक, प्राध्यापक, शिक्षण खाते, मंत्रालय सगळेच सारखेच जबाबदार आहेत. राजकारणाने गढुळलेल्या विद्यापीठ परिसरात बहुतांशी बेशिस्तीचे, शिक्षणाला पूरक नसलेले, निरुत्साही वातावरण बघायला मिळते, हे कटू वास्तव आहे. याला कुठलेही विद्यापीठ, कुठलेही राज्य, अपवाद नाही. अर्थात काही संस्था गुणवत्ता, दर्जा टिकवून आहेत. तेथील शैक्षणिक वातावरण, संशोधन पोषक आहे. पण ही संख्या आपल्या देशाची व्याप्ती लक्षात घेता नगण्य आहे. शाळेतला विद्यार्थी कॉलेजात गेला रे गेला की शिक्षणाविषयी अधिक गंभीर, प्रामाणिक होण्याऐवजी आळशी, बेशिस्त, बेजबाबदार झालेला दिसतो. त्याला उचित मार्गदर्शन मिळत नाही. त्याचे वेळीच समुपदेशन होत नाही. त्याची पालकांना, प्राध्यापकांना गरजही वाटत नाही. शिष्य उत्सुक, उत्साही, गंभीर नसतील तर प्राध्यापकांनी काय करायचे? प्रत्येकाला ताबडतोब यश हवे आहे. त्यासाठी मेहनत करण्याऐवजी वाममार्ग अवलंबिणे सोपे अशी धारणा झाली आहे. यामुळे शिक्षण क्षेत्रातही भ्रष्टाचाराचे पेव फुटले आहे. अशा विपरीत परिस्थितीत दर्जा सांभाळायचा कसा हा यक्षप्रश्न आहे! सध्या मिळणाऱ्या नोकऱ्या या पदवीशी जोडल्या गेल्या आहेत. खरेतर आजकाल उद्योगाचे, तंत्रज्ञानाचे, सेवा क्षेत्राचे स्वरूप आरपार बदलले आहे. त्यासाठी पदवीच्या प्रमाणपत्राऐवजी विशिष्ट अशा कौशल्याची गरज आहे. वेगवेगळ्या उद्योग, सेवा क्षेत्राला हवी असलेली ही कौशल्ये तरुणांनी आत्मसात केली, नव्हे सातत्याने शिकण्याची तयारी ठेवली तर नोकऱ्या सहज उपलब्ध आहेत. कामाचे स्वरूप बदलले आहे. विद्यापीठांनी देखील हा अवतीभवतीचा बदल समजून घेतला पाहिजे. त्यानुसार अभ्यासक्रम, शिक्षण, मूल्यांकन पद्धत आरपार बदलली पाहिजे. जगाच्या स्पर्धेत टिकून राहायचे असेल तर नव्या कोऱ्या पाटीवर नवा अध्याय लिहावा लागेल. आपली एकूणच अध्यापन अध्ययन प्रक्रिया मुळापासून बदलावी लागेल. पुस्तकी ज्ञानापेक्षा कृतिशील, प्रायोगिक शिक्षणाला महत्व द्यावे लागेल. त्यासाठी आधी शिक्षकाला शिकावे लागेल! बदलावे लागेल. आपल्याला कल्पना नसेल,पण हा बदल परदेशी विद्यापीठांनी खूप आधीच स्वीकारला आहे. त्यांनी जुने पुराणे अभ्यासक्रम केव्हाच मोडीत काढले. तिकडे अध्ययन, अध्यापन, संशोधन पद्धतीत सातत्याने बदल झाले. (आपल्याकडे एका विद्यापीठाला ३०० महाविद्यालये संलग्न असतात. त्यामुळे हे बदल सातत्याने घडणे अशक्य असते). तिकडचे संशोधन हे कुठल्यातरी उद्योग संस्थेशी संबंधित, समाजोपयोगी असतेच बहुधाङ्घ आपल्याकडे विद्यापीठाचे नीतीनियम कर्मठ असतात. आता नव्या शैक्षणिक धोरणात त्यात लवचिकता अपेक्षित आहे. एकूणच उच्च शिक्षणाचा दर्जा, गुणवत्ता वाढवणे, त्यासाठी विद्यार्थी, पालक, शिक्षक, सरकारी यंत्रणा या सर्वांनी एकसुरी सांघिक प्रयत्न करणे ही काळाची गरज आहे. या आव्हानाला सामोरे जाणे ही समाजाचीदेखील प्राथमिक गरज आहे.

# प्रजासत्ताक दिन म्हणजेच स्वतंत्र भारताची नियमावली



२६ जानेवारी संविधानाचा व नियमांचा आधारस्तंभ आहे.१५ ऑगस्ट १९४७ ला भारत स्वतंत्र झाला.परंतु स्वातंत्र्यानंतर संविधान, देशाची नियमावली असने गरजेचे असते.कारण कोणत्याही कार्याकरीता पुढे पाऊल टाकण्यास कायद्याच बंधन असने गरजेचे आहे. २६ जानेवारी १९५० रोजी देशाची राज्यघटना लागु झाली.त्यानिमित्याने भारतातील प्रत्येक नागरिक मोठ्या उत्साहाने प्रजासत्ताक दिन साजरा करीत असतो.कारण प्रजासत्ताक म्हणजे लोकांव्दारे लोकांसाठी शासन. भारतात जात,धर्म,पंथ,वंश,गरीब-श्रीमंत, व्देष या संपूर्ण गोष्टी बाजूला ठेवून गुन्या-गोविंदाने प्रजासत्ताक दिवस वेगवेगळ्या संस्कृतीच्या माध्यमातून मोठ्या उत्साहाने साजरा करतात. २६ जानेवारी १९५० रोजी डॉ. राजेंद्र प्रसाद यांची लॉर्ड माउंट बॅटन(गव्हर्नर जनरल) यांच्या जागी भारताचे पहिले राष्ट्रपती म्हणून निवड झाली. २६ जानेवारीच्या निमित्ताने दरवर्षी राष्ट्रपतींच्या हस्ते दिल्लीतील राजपथावर राष्ट्रध्वज फडकवला जातो. आपण ७५ वा प्रजासत्ताक दिन साजरा करीत आहोत.मुख्यत्वे करून २६ जानेवारीला डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी लिहिलेली राज्यघटना लागु करण्यात आली. त्यामुळे स्वतंत्र भारतासाठी हा मोठा आणि गौरवाचा दिवस मानल्या जातो.भारताला स्वतंत्र होऊन ७८ वर्षे झाली असली तरी आजही देशात आपल्याला गुन्हेगारी, भ्रष्टाचार, बँक घोटाळे,झुंड बळी, जातीयवाद, हिंसाचार,यांच्याशी आजही आपण लढतोय ही स्वतंत्र भारतासाठी शोकांतिकाच म्हणावी लागेल.अशा गुन्ह्या विरूद्ध सरकारने व राजकीय पुढाऱ्यांनी एकत्र येण्याची नितांत गरज आहे. कारण देश स्वतंत्र करण्यासाठी महात्मा गांधी,भगतसिंग, राजगुरू, सुभाषचंद्र बोस, झाशीची राणी, लाला लजपतराय, लोकमान्य टिळक, चंद्रशेखर आझाद, हजारो क्रांतिकारक, मवाळवादी -जहालवादी, थोर महात्मे इत्यादीसह लाखो स्वतंत्र शुरविरांनी आपल्या प्राणांची आहुती दिली.तेव्हाच १५ ऑगस्ट १९४७ हा दिवस उदयास आला.भारताच्या थोर महात्म्यांना भारत स्वतंत्र करण्यासाठी दोन नद्यांचा सहारा घ्यावा लागला व त्या दोन नद्यांचा उगम झाला एक मवाळवादी तर दुसरी जहालवालवादी यांच्या संगमानेच भारतीय स्वातंत्र्यलढा उभा झाला. याकरिता आपल्याला १५ ऑगस्ट१९४७ उजाडण्यासाठी तब्बल १५० वर्षे वाट पाहावी लागली.१५० वर्षांच्या काळातील स्वतंत्र विरांचे बलीदान व्यर्थ जावु नये व त्यांचा सन्मान व्हावा या उद्देशाने २६ जानेवारी १९५० रोजी राज्यघटना अस्तित्वात आणली.यात मुख्यत्वेकरून डॉ बाबासाहेब आंबेडकर, डॉ राजेंद्र प्रसाद, सरदार वल्लभभाई पटेल,पंडित जवाहरलाल नेहरूसह अनेक थोर महात्म्यांचा सिंहाचा वाटा आहे.परंतु दुःखाची गोष्ट म्हणजे गेल्या ३० वर्षांपासून देशात भ्रष्टाचार, करोडोचे घोटाळे, बलात्कार, गुन्हेगारी,निवडणुकांमध्ये जातीयवाद याला मोठ्या प्रमाणात उत आल्याचे पहायला मिळते.ही शहिद विरांच्याप्रती अत्यंत दुःखद व चिंताजनक बाब आहे. आपल्या पुर्वजांनी व देशाच्या स्वतंत्र संग्राम सेनानींनी आणि बहादुर विरांनी घर-दार, परीवार या संपूर्ण गोष्टी बाजूला सारून व त्याग करून स्वातंत्र्याच्या अग्नी कुंडात उडी घेतली व लाखोंच्या संख्येने बलीदान दिले. परंतु आपली शोकांतिकाच म्हणावी लागेल की आपण भारत स्वतंत्र होऊन ७८ व्या वर्षीत पदार्पण करीत आहोत तरीही भारतातील भ्रष्टाचार थांबलेला नाही. आज भारतातील राजकीय पुढाऱ्यांजवळ, पुंजीपतीं, वॉलीउडक्षेत्र व भ्रष्ट सरकारी अधिकाऱ्यांजवळ वाममार्गाने कमवीलेली करोडोंची चल-अचल संपत्ती आजही आहे. ही संपत्ती एकत्र केली तर भारताला तब्बल १० वर्षे कोणाही जवळुन कर्ज घ्यावे लागणार नाही व गरीबी संपुष्टात येवु शकते आणि देश सुजलाम - सुफलाम होण्यास मोठी मदत मिळेल.याकरिता भ्रष्ट अधिकारी व भ्रष्ट राजकीय पुढारी ही देशाला लागलेली कीड आहे ही कीड जळामुळासकट नष्ट व्हायला हवी व यावर आळा बसायला हवा.आज मुठभर राजकीय पुढाऱ्यांनी करोडो रुपयांची चल-अचल संपत्ती डांबुन ठेवल्याने व चलनात नसल्याने देशातील गरीब वर्ग गरीबीच्या खाईत जात आहे तर श्रीमंत वर्ग दिवसेंदिवस श्रीमंत होत आहे व देशाच्या विकासामध्ये मोठा अडथळा निर्माण होत आहे.यामुळेच देशात महागाई व बेरोजगारी मोठ्या प्रमाणात दिसून येते.भारताचे प्रजासत्ताक दिनाचे ७५ व्या वषार्चे औचित्य साधून देशातील संपूर्ण भ्रष्टाचाऱ्यावर कठोर कारवाई करून त्यांनी वाममार्गाने कमवीलेला पैसा सरकारने आपल्या तिजोरीत जमा करावा. यामुळे देशाचा विकास, बेरोजगारीची समस्या, महागाई यावर आळा घालण्यासाठी मोठी मदत होईल व देशाचा विकास भरभराटीला येईल.याचे स्वागत आपले पुर्वज,शहीद व स्वतंत्र सेनानी अवश्य करेल व त्यांच्या स्वतंत्र लढ्याला दिलासा अवश्य मिळेल हीच प्रजासत्ताक दिनाच्या निमित्ताने शहिदांना खरी आदरांजली ठरेल.देशात वाढते हवामानातील बदल, प्रदूषण व ग्लोबल वार्मिंगचा धोका पहाता.प्रजासत्तक दिनाचे औचित्य साधून मोठ्या प्रमाणात वृक्षलागवड व्हायला हवी. याकरीता शाळा, कॉलेज, संपूर्ण सरकारी क्षेत्र, राजकीय पुढारी, सामाजिक संघटना यांनी पुढाकार घ्यायला हवा.यामुळे मोठ्या प्रमाणात वृक्षारोपण होईल व प्रदूषणावर मात करण्यासाठी मोठी मदत मिळेल. आजच्या दिवशी वृक्षलागवड झाली तर ती अनंतकाळापर्यंत सर्वांच्या हृदयात राहील व लाखो शुरविरांचे दर्शन प्रत्येक झाडाच्या पानात, फुलात, फळात व जळामुळात आपल्याला होईल. यामुळे भारतीय शहिदांची व शुरविरांची गाथा अबाध्य आहे.कारण त्यांच्या आशीवार्दानेच आपण आज मोकळा श्वास घेत आहोत. जय हिंद!



**रमेश कृष्णराव लांजेवार**
(माजी विद्यापीठ प्रतिनिधी नागपूर)
मो.नं.९२१६९०७७९,नागपूर.

**प्रबोधन**

# लाभो सर्व देशा` स्वातंत्र्य प्रत्यक्ष

मध्ययुगीन भारताचं वर्णन करताना कुशाग्र बुद्धीच्या एका मर्मज्ञाने म्हटले होते, खलक खुदका, मुलुक बादशहाका, राज्य अंगरेज सरकार का! हे वर्णन दीडशे-दोनशे वर्षांपूवीर्च असून देशव्यवस्थेचा कसा त्रिफळा उडाला होता, हे सांगणारं होतं. त्यानंतर बादशहांची राजवट गेली, इंग्रज तर साता समुद्रापार गेले. गांधी युग आलं. लोकशाहीची प्राणप्रतिष्ठा झाली. जगातील मोठ्या लोकसंख्येची महामहा लोकशाही म्हणून ती समाजशास्त्रज्ञांनी गौरवली. पण प्रत्यक्षात काय आहे? देश भारतवासीयांचा, सत्ता राजकारण्यांची आणि कारभार नोकरशहांचा! त्यात पुन्हा कशाचा कशाशी संबंध नसलेली अवस्था! तरीही नवी पिढी चिल्लीपिल्ली प्रतिज्ञाबद्ध होताना म्हणते, 'भारत माझा देश आहे, माज्या देशाच्या गौरवशाली परंपरांचा मला अभिमान आहे. 'इत्यादी इत्यादी. पण खरोखर भारत हा आपला देश आहे,असं आम्हा सर्वांना वाटतं काय? २६ जानेवारी २०१२ला आपली राज्यघटना अस्तित्वात आल्याला बासष्ठ वर्ष पूर्ण होतील, पण आपण अजून भारतीय होऊ शकलेलो नाही. आपण पंजाबी, बंगाली, गुजराती, कन्नडी, तमिळी, महाराष्ट्रीय आहोत; पण भारतीय नाही. एका परदेशी प्रवाशाने म्हटलं, 'मी भारतभर फिरलो, मला बंगाली माणसं भेटली, मराठी भेटली. कन्नड, गुजराती आढळली, पण भारतीय माणसं आढळली नाहीत.' अशा विस्कळीत मनःस्थितीच्या लोकांनी भारताला एक सार्वभौम राष्ट्र म्हणून प्रतिष्ठित न होऊ देता एखाद्या उद्ध्वस्त धर्मशाळेची अवकळा आणली आहे.अशा स्थितीत भारत हा प्रजासत्ताक नाही,लोकशाही असूनही लोकांशी बांधील नाही, हे दुःखदायक आहे. अब्राहम लिंकनने सांगितलेली लोकशाहीची व्याख्या इंग्लंड-अमेरिकेसाठीच योग्य आहे, भारतासाठी नव्हे!अब्राहम लिंकनने लोकांचे, लोकांकडून चालवले जाणारे आणि लोकांसाठी असलेले राज्य म्हणजे लोकशाही असं म्हटलं, पण भारतीय लोकराज्य हे मुळात लोकांचं नाहीच! भारतीय लोकशाहीच मुळात प्रत्यक्ष लोकशाही (Direct democracy) नसून अप्रत्यक्ष लोकशाही (Indirect DemocrÔcy) आहे, हे आपण समजून घ्यायला हवं. लोकांनी लोकप्रतिनिधींना आपला मताधिकार वापरून निवडून द्यायचं असतं. पण ही मंडळी खासदार, आमदार,नगरसेवक म्हणून निवडून आल्यानंतर ते लोकांचा विचार करीत नाहीत, हे आता सिद्ध होतं. आहे. म्हणून त्यांना पदच्युत करण्याच्या हक्काची मागणी मूळ धरीत आहे. महात्मा गांधीजींनी

तत्त्वहीन राजकारण हे राष्ट्रीय पाप आहे, असं म्हटलंय. आमचं राजकारण त्या पापाने आपादमस्तक लडबडलेलं आहे. भारतीय लोक मताधिकारापुरतेच लोकशाहीशी संबंधित आहेत. पण 'मतदाना' चा अर्थही ते समजू शकत नाही; कारण ते अज्ञानी किंवा अर्धशिक्षित आहेत. म्हणूनच प्राचार्य शिवाजीराव भोसले म्हणतात, 'मत हे ज्ञानावर आधारित असेल, तर ते विवेकी असतं. विवेकी लोकमत हा लोकशाहीचा आधार आहे. ज्ञानाशिवाय व्यक्त होणारं मत, हे निराधार असतं.' म्हणून तर भारतीय लोकशाही ही खरी नाहीच. तो लोकशाहीचा पोकळ, भोंगळ,अजागळ देखावा आहे. सोंग, ढोंग, नाटक आहे. अशा या भारतीय लोकशाहीला प्रत्यक्ष स्वरूप द्यायचं असेल, तर ग्रामस्वराज्याशिवाय दुसरा पर्याय नाही. पंचायत राज, अपना राज ही एकेकाळी झालेली घोषणा याची साक्ष आहे. त्यानुसार लोकशाहीचा कारभार चार पातळ्यांवर वाटला गेला पाहिजे. त्यासाठी केंद्र, राज्य, जिल्हा आणि गाव अशी चारस्तरीय राज्यव्यवस्था अंमलात येणं आवश्यक आहे.त्यासाठी संविधानात आवश्यक बदल-दुरुस्त्या केल्या पाहिजे.'धर्म, राजकारण आणि विज्ञान ही राष्ट्रजीवनाची तीन महत्त्वाची अंग आहेत. पण या जीवनशाखांचं दर्शन दुदैर्वाने विदारक आहे. धर्म माणसाला भावला नाही. राजकारण कळलं नाही आणि विज्ञान मानवलं नाही. वाहत्या गंगेच्या प्रवाहात माणूस कोरडा राहिला आहे,' असं आपलं अपेक्षाभंगाचं दुःख प्राचार्य शिवाजीराव भोसले यांनी व्यक्त केलं आहे. असंच दुःख

व्यक्त करताना भारतीय लोकशाहीचे थोर तत्त्वचिंतक प्राचार्य पी.बी.पाटील म्हणतात,'विद्या, सत्ता, संपत्ती यांचं केंद्रीकरण मूठभरांच्या हातात करून बळी तो कानपिळी हा जंगली न्याय समाजाच्या सर्व व्यवहारात जोपसला जात आहे. त्यामुळे लोकशाहीतील लोक आणि समाजवादातील समाज भरडून नष्ट होण्याच्या पंथाला लागले आहेत.' स्वामी विवेकानंदांनी कुत्सितपणे म्हटलं होतं, 'भारताचं ऐश्वर्य कोणतं? अध्यात्म परायणता?' खरं तर, या अध्यात्माने ऐहिक जाणिवेचं अपरंपार नुकसान केलं आहे, हे त्यांना सुचवायचं होतं. भारतीय लोकशाहीला अप्रत्यक्ष लोकशाहीची जी अवकळा प्राप्त झाली आहे, तिचं कारणही भारतीय जीवनदृष्टीतील अध्यात्म प्रवणताच कारणीभूत आहे. प्रत्येक देशवासी जर ठेविले अनंते तैसेची राहावे असा दृष्टिकोन बाळगत असेल, तर देशाचं कल्याण होऊ शकत नाही. म्हणून भारतीय प्रजासत्ताक आचंद्रसूर्य नांदावं, अशी जर आपली सर्वांची इच्छा असेल, तर अप्रत्यक्ष लोकशाहीचं प्रत्यक्ष लोकशाहीत रूपांतर करावं लागेल. मग कुठे गणतंत्र दिनाचा तिरंगा नवचैतन्याने मुक्त वाऱ्यावर लहरू लागेल आणि भारतमातेच्या चेहऱ्यावर प्रसन्न हास्य तरळू लागेल. त्यासाठी-

खरी लोकसत्ता । येवो भारतात
राहू दे सुखात। देश सारा ॥१
ग्रामस्वराज्याचे स्वप्न गांधीजींचे
लाभोत सत्याचे पंख त्यास ॥२
लोकप्रतिनिधी`
आजचे उन्मत्त
जनतेचे हित । दुर्लक्षिती ॥३
मतदाते अज्ञ । लुबाडले जाती
कसायाच्या हाती। पशू जसे ॥४
कुंपणाने शेत खाल्ले मुळातून
कराया रक्षण कोणी नाही ॥५
दिल्लीवरी सत्ता । गल्लीची येऊ दे
लोकांना मिळू दे राज्यपद ॥६
जनतेची इच्छा। सुखी जीवनाची
हाव नसे त्यांची फार मोठी`७
लाभो सर्व देशा। स्वातंत्र्य प्रत्यक्ष
स्वर्गा समकक्ष। तेच आहे ॥८



**प्रा. डॉ. जे. बी. शिंदे**
844/1, साळोखेनगर,
कळंबा रोड, कोल्हापूर-416012
92258 09071

पान १ वरून

# सत्ताधारी कामाला लागेनात...

पाहण्यास मिळत आहेत. राज्यातील सत्ताधारी मंडळी कामाला लागले नाहीत तर दुसरीकडे विरोधकांना सूर सापडत नसल्याचे चित्र पाहावयास मिळत आहे.

राज्यात महायुतीचे सरकार सत्तेत येऊन एक महिन्यापेक्षा अधिकचा कालावधी उलटला आहे. तरी अद्याप हे सरकार कामाला लागल्याचे चित्र काही केल्या दिसत नाही. विशेषतः सरकार सत्तेत आल्यानंतर घडलेल्या दोन घटनांमुळे राज्य सरकार काहीसे बॅकफूटवर असल्याचे चित्र दिसत आहे. मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्येमुळे वातावरण काहीसे तापलेले आहे. या प्रकारणातील आरोपीला अटक केली आहे. दुसरीकडे परभणीतील दगडफेक प्रकरणी न्यायालयीन कोठडीत असलेल्या सोमनाथ सूर्यवंशी या तरुणाचा कारागृहात मृत्यू झाला होता. त्यामुळे सत्ताधारी व विरोधकांने राज्य सरकारला या दोन्ही प्रकरणावरून घेरले आहे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस एकटेच एकहाती सगळ्या भूमिका पार पडत आहेत. दावोसमध्ये जाऊन मुख्यमंत्री फडणवीस यांनी मुंबई, पुण्यासह महाराष्ट्राच्या हिताच्या काही योजना आणल्या आहेत. दावोसमधून आणण्यात आलेल्या कामामुळे येत्या काळात महाराष्ट्राला समतोल विकास साधण्याच्या दृष्टीने हातभारच लागणार आहे. त्यामुळे या सरकारच्या कारभारामध्ये अर्थात देवेंद्र फडणवीस मुख्यमंत्री असल्यामुळे त्यांचाच प्रभाव असणे गृहीत धरले आहे. मुख्यमंत्री फडणवीस यांनी शंभर दिवसांमध्ये प्राधान्याने करण्यात येणाऱ्या कामांची यादी दिली आहे. त्यानुसार प्रत्येक विभागाला काम करायचे आहे. त्याचा आढावा घेण्याच्या दृष्टीने कोणी आतापर्यंत कष्ट घेतलेले दिसत नाही. पालकमंत्र्याच्या यादीवरून मुख्यमंत्री एकनाथ शिंदे नाराज असल्याच्या बातम्या आल्या आहेत. शिंदे यांनी आपली नाराज दाखवण्यासाठी मुंबईमधून सातारा जिल्ह्यातील आपल्या दरे या गावात जाऊन मुक्काम ठोकणे पसंत केले आहे. त्यानंतर दोन जिल्ह्याचे जाहीर करण्यात आलेले पालकमंत्री रद्द करण्यात आले आहेत. त्यामुळे प्रजासत्ताक दिनानिमित्त या दोन जिल्ह्यातील झेंडावंदनाची संधी कोणाला मिळणार? याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. दुसरे उपमुख्यमंत्री अजित पवार पुण्याच्या कार्यक्रमातच व्यस्त आहेत. पुणे सोडून ते बाहेर पडलेले नाहीत. दुसरीकडे महत्वाची खाते नवीन मंत्र्यांकडे सोपविण्यात आली आहेत. त्यांना राज्यभर फिरून आपली खाते नीट समजून घेऊन काम करण्याची गरज आहे. त्यामुळेच सरकार म्हणजे फक्त फडणवीस असे चित्र निर्माण होत आहे. तशास्वरूपाचे चित्र निर्माण होणे राज्याच्या प्रतिमेच्या दृष्टीने फारशी चांगली गोष्ट नाही. नुकत्याच झालेल्या विधानसभा निवडणुकीत महाविकास आघाडीला अनपेक्षितपणे धक्का बसला. या धक्क्यातून सावरत आता ठाकरे गटाने आगामी काळात होत असलेल्या स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुकीवर लक्ष केंद्रीत केले आहे. कोणत्याही परिस्थितीत शिवसेनेला मुंबई महापलिकेचा गड कायम ठेवण्यासाठी उद्धव ठाकरे यांनी आतापासूनच कंबर कसली आहे. त्याचसंबंधी ठाकरे गटाच्या मेळाव्यात उद्धव ठाकरेंनी येत्या काळात होत असलेल्या स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुका स्वबळावर लढण्याची घोषणा यापूर्वीच केली आहे. गुरुवारी मुंबईत झालेल्या शिवसेनेच्या मेळाव्यात उद्धव ठाकरे यांनी 'एकला चलो रे'चे संकेत दिले आहेत. राज्यातील प्रमुख विरोधी पक्ष असलेल्या महाविकास आघाडीत सर्व काही आलबेल आहे, असे चित्र दिसत नाही. शिवसेना उद्धव ठाकरे गटाकडून आगामी काळात होत असलेल्या स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुकीत स्वबळाचा नारा देण्यात आला आहे. यामुळे महाविकास आघाडी संपुष्टात येण्याची शक्यता आहे. आगामी काळात स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुका होणार असल्याची चर्चा आहे. या निवडणुका महाविकास आघाडी एकत्र लढणार का कळीचा मुद्दा आहे. त्यामुळे याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

# शक्तिपीठ महामार्गविरोधात शेतकऱ्यांनी आवळली मूठ



**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** जिल्ह्यातील बार्शी, उत्तर सोलापूर,मोहोळ, पंढरपूर आणि सांगोला या पाच तालुक्यातून जाणाऱ्या नागपूर- गोवा या महामार्गविरोधात बाधित शेतकऱ्यांनी मूठ आवळली असून हा प्रस्तावित महामार्ग शेतकऱ्यांना देशोधडीला लावणारा असल्याने तो रद्द करावा, या मागणीसाठी शेतकऱ्यांनी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर धरणे आंदोलन केले. शुक्रवारी, सोलापूर

जिल्ह्यातील बाधित शेतकऱ्यांनी कार्यालयासमोर जिल्हाधिकारी धरणे आंदोलन करून सरकारच्या विरोधात जोरदार घोषणाबाजी केली. या महामागार्मुळे शेतकरी विस्थापित होणार सल्याने तो कायमस्वरूपी रद्द करावा, अशी घोषणाबाजी करून प्रशासनाचे लक्ष वेधून घेतले.या प्रस्तावित महामागार्साठी बार्शी, उत्तर सोलापूर, मोहोळ,पंढरपूर आणि सांगोला या तालुक्यातील शेतकऱ्यांच्या जमिनी संपादित केल्या जाणार आहेत. त्यामुळे मुळातच शेतीचे क्षेत्र कमी असल्याने या राष्ट्रीय महामार्गात आणखी जमिनी संपादित केल्यामुळे जिल्ह्यातील हजारो शेतकरी विस्थापित होणार आहेत. त्यांच्याकडे जगण्यासाठीचे कोणतेही साधन शिल्लक राहणार नाही.रद्द त्यामुळे अल्पभूधारक शेतकरी कायमस्वरूपी विस्थापित होऊन बेघर होतील. त्यामुळे हा राष्ट्रीय महामार्ग कायमस्वरूपी करावा या मागणीसाठी आंदोलन करण्यात आले. आंदोलनकर्त्या शेतकऱ्यांनी यावेळी जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांना विविध मागण्यांचे निवेदन देऊन शक्तिपीठ महामार्ग रद्द करावा, अशी मागणी केली. या आंदोलनात गणेश घोडके, राहुल भड, विजयकुमार पाटील, हनुमंत जाधव,आप्पा पवार, दत्ता काकडे आदींनी सहभाग नोंदविला.

# कॉंग्रेसला मिळालेले हृदयस्पर्शी युवा नेतृत्व- रोहनभैय्या सुरवसे-पाटील

मी समस्त समाजाचा आहे आणि हा समस्त समाज माझा आहे.मानव ही माझी जात आणि माणुसकी हा माझा धर्म आहे.मी या माज्या अखंड आयुष्यात समस्त समाजाचे देणे लागतो. हा उद्दात्त, निर्मळ, निःस्वार्थी हेतूची, स्वतःच्या हृदयात जपणूक करून, ज्यांनी समाजासाठी अखंड आयुष्य पणाला लावले,समाज विकासात स्वतःला झोकून दिले, अशा थोर महा पुरुषांचा आदर्श आणि त्यांचे विचार मनाच्या गाभाऱ्यात साठवत,ज्या युवकाने अत्यंत कमी वयात समाज कायार्चा प्रचंड मोठा ध्यास घेऊन, कर्तुत्वाचा आलेख गगनाला भिडवला ते युवा नेतृत्व स्वाभिमानी ब्रिगेड संघटनेचे संस्थापक अध्यक्ष व प्रदेश कॉंग्रेस युवक सरचिटणीस रोहनभैय्या सुरवसे- पाटील.!

शिखर शिंगणापूर येथील, शंभू महादेवाच्या पायथ्याशी वसलेल्या, रूबाबदार अशा माळशिरस तालुक्यात, रोहनभैय्यांचा जन्म झाला. त्यांनी कोंडबावी गावातून अगदी लहान वयातच, समाजकायार्चा विडा उचलला!अत्यंत मनमिळावूपणा, सोज्वळता, नम्रता, अती संयमता, उत्कृष्ट वाणी,सौजन्य आणि सहनशीलतेचे ज्वलंत प्रतीक असलेले,रोहनभैय्या यांच्या सहवासात नी सानिध्यात महाराष्ट्र राज्यातला, तमाम युवा वर्ग आला आणि त्यांच्या सहकायार्ने रोहनभैय्या यांनी तळागाळातील प्रश्नांना वाचा फोडण्याचे महान काम सुरू केले.

सत्ताधीशांच्या आणि सत्ताधारी यांच्या मुलांना राजकारणात सहजतेने, संधी प्राप्त होत जाते. परंतु कोणत्याही प्रकारचा कुटुंबात, राजकीय वारसा नसताना, राजकारणात आणि समाजकारणात कर्तुत्व दाखवायचे म्हणले तर वाट्याला संघर्ष येतच राहणार, यात शंका नाही.

रोहन सुरवसे पाटील यांनी समाज हितासाठी, त्यांच्या विविध प्रश्नांसाठी संघर्ष करीत आहेत. समाज सेवेचे नवे पर्व, नवी दिशा आणि नवी आशा बाळगून, उच्च विचारसरणी, उच्च महत्वकांक्षा प्रकाशझोतात आणून त्यांनी स्वाभिमान जपला आहे.

तारुण्याची उर्मी, स्वप्नपूतीर्चा ध्यास आणि ध्येय प्राप्तीची ओढ असलेला युवक सामाजिक चळवळीतील युवा नेतृत्व म्हणून कौतुकास्पद ठरू लागले आहे. समाजाचे आणि आपल्या मातीची इमान राखणारी ऊर्जा, महाराष्ट्र राज्याच्या विविध जिल्ह्यात प्रकाश झोतात येऊ लागली आहे.ज्यांना अंतःकरणपूर्वक समाजहिताचे कार्य करायचे असेल तर त्यांना राजकारणा शिवाय पर्याय नसतो किंवा त्यासाठी राजकीय वारसदार असावे लागते. परंतु कोणत्याही प्रकारचा राजकीय वारसा नसताना, केवळ समाज आणि समाजहितासाठी, समाजसेवा करायची हा उद्देश ठेवून, रोहन सुरवसे- पाटील यांनी कॉंग्रेस पक्षाच्या, माध्यमातून दखलपात्र असेच समाजकार्य केले आहेत. विविध आंदोलने केली आहेत आणि करत आहेत, त्यांनी केलेल्या कायार्मुळे त्यांना दिल्लीत तसेच महाराष्ट्रातील विविध जिल्ह्यातील, संस्थेने पुरस्कार देऊन गौरविले आहे. असे कार्य कर्तृत्ववान युवा नेतृत्व पुढे येणे गरजेचे आहे.

सर्वसामान्यांसाठी, गोरगरीब जनतेसाठी, अहोरात्र झटणाऱ्या मनमिळावू युवक नेतृत्वास, कॉंग्रेसने समाजाच्या हितासाठी एखादी मोठी जबाबदारी द्यावी अशी रोहनभैय्या सुरवसे पाटील यांचे समर्थक बोलून दाखवत आहेत. रोहनभैय्या सुरवसे पाटील यांच्या सारख्या प्रामाणिक आणि प्रेमळ युवा नेतृत्वास वाढदिवसाच्या हृदयपूर्वक शुभेच्छा देतो...



**विलास गायकवाड**
**अकलूज**

हे दैनिक मालक-प्रकाशक, मुद्रक, संपादकः श्री पांडूरंग हरिदास सुरवसे यांनी संस्कृती प्रिंटींग प्रेस, एफ-3, वृंदावन पार्क, होटगी रोड, सोलापूर - 413003 येथे छापून येथूनच प्रसिद्ध केले. कार्यालयः एफ - 3, वृंदावन पार्क, होटगी रोड, सोलापूर - 413003
फोन/फॅक्स (0217)2605091 RNI No . MAHMAR 2006/17624 संपादकः पांडूरंग हरिदास सुरवसे, मो. (9765390339) उपसंपादकः सचिन मोहन जाधव, मो. (9657069069) कायदा सल्लागारः ॲड खतीब वकील.
Owner, Publisher, Printer and Editor Pandurang Haridas Survase Printing at Sanskruti Printing Press F-3 Vrundavan Park, Hotagi Road, Solapur 413003. (Maharashtra) Published from Office F-3 Vrundavan Park, Hotagi Road, Solapur 413003.(Maharashtra) Phone-0217-2605091 Editor Pandurang Survase-9765390339, Deputy Editor Sachin Jadhav-9657069069. **RNI No. MAHMAR 2006/17624**

# प्राणी क्लेष प्रतिबंधक कायद्याची जिल्ह्यात प्रभावीपणे अंमलबजावणी करावी



**सोलापूर,(कटूसत्य वृत्त)**:- महाराष्ट्र प्राणी रक्षण कायदा 2015 प्राणी क्लेष कायदा 1960 वाहतूक नियम मधील तरतुदीचे पालन करणे गरजेचे असून, प्राण्यांना क्रुरतेने वागविण्यास प्रतिबंध आहे. बैलगाडीतून साखर कारखान्याकडे ऊस वाहतूक करताना बैलांवर होणाऱ्या क्रुरतेस प्रतिबंध आहे. तरी सर्व संबंधित शासकीय यंत्रणेने जिल्ह्यात प्राणी क्लेश कायद्याच्या नियमांची अंमलबजावणी करून सुव्यवस्था राखण्याच्या सुचना उपजिल्हाधिकारी महसूल अमृत नाटेकर यांनी जिल्हा प्राणी क्लेष प्रतिबंधक समितीची बैठकीत दिल्या.

जिल्हाधिकारी कार्यालय, सोलापूर येथे जिल्हा प्राणी क्लेष प्रतिबंधक समितीची बैठक घेण्यात आली. यावेळी जिल्हा वन अधिकारी कार्यालयाचे गोवर्धन चोपडे, महानगरपालिकेचे डॉ. सतिश चौगुले, उपप्रादेशिक परिवहन अधिकारी विजय पाटील, उपशिक्षणाधिकारी स्वाती हवेले, पोलीस निरिक्षक नामदेव शिंदे, पोलीस निरिक्षक बाळासाहेब भरणे, जिल्हा पशुसंवर्धन उपआयुक्त, डॉ. विशाल येवले, प्रादेशिक सहसंचालक (साखर) सोलापूर विभागाचे आर. एस. राठोड, इंदेश्वर शुगर बार्शीचे व्यवस्थापकीय संचालक ए. एस. जाधव आदी उपस्थित होते.

प्राण्यांना क्रूरतेने वागविण्यास प्रतिबंध करण्याबाबत प्राण्यांची पायी वाहतूक नियम 2001 या कायदा व नियमांच्या तरतुदींचे काटेकोरपणे पालन केल्याखेरीज जनावरांची वाहतूक करण्यात येऊ नये. सदर अधिनियमातील कलम 11 (1) (क) नुसार कोणत्याही व्यक्ती कोणत्याही प्राण्यांला मारणे, त्याच्यावर अधिक भार लादणे, प्राण्यांना क्रुरतेने अधिक दामटणे, त्याच्या वर क्षमतेपेक्षा जास्त वजन वजनांचा भार देणे, त्यांच्या छळ करणे किंवा त्या प्राण्यांना उगीच वेदना व यातना होतील अश्या बाबींच्या विषयी दंड व कारावासाची शास्ती नमूद आहे.

तसेच प्राण्यांना क्रुरतेने वागविण्यास प्रतिबंध करण्याबाबत अधिनियम 1960 या मसुदा आणि पॅक 1965 च्या नियम 6 नुसार जनावरांना दिवसभरातून नऊ तासाहून अधिक काळ वाहतुक करु देऊ नये तसेच तापमान 37 अंश सेल्सयिस पेक्षा जास्त असेल अश्या ठिकाणी दुपारी 12.00 ते 3.00 वेळेमध्ये विश्रांती देण्यात यावी अशा सुचनाही बैठकीत दिल्या.

प्राण्यांना कुरतेने वागविण्यास प्रतिबंध करण्याबाबत अधिनियम 1960 या कायद्यांतर्गत प्राण्यांची पायी वाहतूक नियम 2001 च्या नियम 12 नुसार सुर्योदयापूर्वी किंवा सुर्यास्तानंतर कोणत्याही व्यक्तीने जनावरांची पायी ने-आण करु नये तसेच जनावरे (बैल) 30 किमी किंवा 8 तास व खाण्यापिण्यासाठी 4 किलोमीटर प्रति २ तास यापलीकडे प्राण्याची पायी ने-आण करता येणार नाही असे अधिसूचित केले आहे.तसेच बैलगाडा शर्यतीचे आयोजन करताना परवानगी घेऊन करावी विना परवानगी शर्यतीचे आयोजन करु नये असे आवाहनही उपजिल्हाधिकारी (महसूल) अमृत नाटेकर यांनी केले आहे.

# सांगोला न.पा.कडून थकबाकीदार इमारत व गाळे तसेच खुल्या जागेधारकांना नोटीस बजाविण्यात आली

**सांगोला (कटूसत्य वृत्त)**:- सांगोला नगरपालिकेकडून सन २०२४- २५ अखेर १५ हजार ८४५ खुली जागा, गाळेधारक व मालमत्ताधारकांकडून थकबाकी वसुलीमध्ये एकूण ६ कोटी १२ लाख २७ हजार उद्दिष्टापैकी आजअखेर १ कोटी २८ लाख ७ हजार रुपये वसुली केली आहे. उर्वरित ४ कोटी ८४ लाख २० हजार रुपये थकबाकी वसुलीसाठी सांगोला नगरपालिकेकडून ६ वसुली पथकाच्या माध्यमातून वसुली मोहीम सुरू करण्यात आली आहे. यासाठी थकबाकीदार इमारत व गाळे तसेच खुल्या जागेधारकांना नगरपालिकेकडून नोटीस बजाविण्यात आली आहे. थकबाकीदारांनी वेळेत आपली थकबाकी भरून नगरपालिका प्रशासनास सहकार्य करावे, असे आवाहन नगरपालिकेच्यावतीने केले आहे. सांगोला नगरपालिका अंतर्गत एकूण १५ हजार २६६ मालमत्ता धारक आहेत. यासह एकूण ३६६ गाळेधारक व २१२ खुली जागा आहेत. या नगरपालिकेच्या मालमत्ता धारक, खुला जागा तसेच गाळा धारक असे एकूण १५ हजार ८४४ खातेदारांकडून नगरपालिकेची कर वसुली मोहीम राबविण्यात येत आहे. यामध्ये सन २०२४-२५ अखेर थकबाकीदार असलेल्या गाळा भाडे,खुला जागा भाडे तसेच मालमत्ताधारक थकबाकीदार करदात्यांना नगरपालिकेकडून नोटीस बजाविण्यात आली आहे. यापुढील काळात उर्वरित थकबाकीदार मालमत्ताधारकांना नोटिसा बजावण्याची प्रक्रिया प्रगतीपथावर सुरू आहे. शहर आणि उपनगरामध्ये ६ वसुली पथकामार्फत थकबाकी जमा करण्याची प्रक्रिया ही सुरू करण्यात आली आहे. नागरिकांनी नगरपालिकेच्या या वसुली मोहीम पथकास सहकार्य करून आपली थकबाकी भरून घ्यावी, असे आवाहन या वसुली पथकाच्या माध्यमातून करण्यात येत आहे.

सांगोला नगरपालिकेकडील मालमत्ताधारकांकडील मागील थकबाकी १ कोटी २८ लाख ४५ हजार आहे. यामध्ये चालू मालमत्ता कर म्हणून २ कोटी २८ लाख रुपये असे एकूण ३ कोटी ५६ लाख ७९ हजार रुपये थकबाकीपैकी आजअखेर १ कोटी १४ लाख १५ हजार रुपये वसुली करण्यात आली आहे. इमारत व गाळा भाडे यामध्ये थकीत मागणी म्हणून १ कोटी ४३ लाख २८ हजार रुपये तर चालू मागणी म्हणून, १ कोटी १२ लाख १९ हजार असे एकूण २ कोटी ५५ लाख ४८ हजार रुपयांचे वसुलीचे उद्दिष्ट आहे. पैकी आजअखेर १३ लाख ९२ हजार वसुली करण्यात आली आहे. उर्वरित २ कोटी ४१ लाख ५६ हजार रुपयांची वसुलीसाठी पथके कार्यान्वित करण्यात आली आहे. या वसुली पथकाच्या माध्यमातून १ जानेवारीपासून थकबाकीदारांना नगरपालिकेकडून नोटिसा बजावण्यात येत आहेत. उर्वरित थकबाकीदारांना नोटिसा बजाविण्याची प्रक्रिया सुरू आहे.थकबाकीदारांनी वेळेत थकबाकी

भरून नगरपालिकेच्या होणाऱ्या पुढील कारवाईपासून बचाव करावा.तसेच आपली थकबाकी भरून नगरपालिका प्रशासनास सहकार्य करावे, असे आवाहन मुख्याधिकारी डॉ. सुधीर गवळी यांनी केले आहे. या कर वसुली मोहिमेसाठी कार्यालय अधीक्षक सचिन पाडे, कर निरीक्षक रोहित गाडे, प्रियांका पाटील

यांच्या मार्गदर्शनानुसार वसुली पथक कार्यान्वित करण्यात आले आहे.

# नातेपुते येथील महाविद्यालयात राष्ट्रीय मतदान दिन साजरा

**नातेपुते (कटूसत्य वृत्त)**:- शनिवार दिनांक २५ जानेवारी २०२५ रोजी सहकार महर्षी शंकरराव मोहिते पाटील महाविद्यालय नातेपुते, येथे राष्ट्रीय मतदार दिन साजरा करण्यात आला.महाविद्यालयामध्ये राष्ट्रीय सेवा योजना विभागांतर्गत राष्ट्रीय मतदार दिनानिमित्त विद्यार्थ्यांना मतदार शपथ व मार्गदर्शन करण्यात आले. या कार्यक्रमाचे आयोजन महाविद्यालयाचे प्र.प्राचार्य डॉ. रज्जाक शेख यांच्या मार्गदर्शनाखाली झाले. प्रा.डॉ.डी.एस.थोरात यांनी आपल्या मनोगतातून सांगितले की नवतरुण मतदारांनी मतदान करणे, हे आपले आद्य कर्तव्य समजून निवडणूक प्रक्रियेत भाग



घेतला पाहिजे. महाविद्यालयीन युवकांनी मतदान जनजागृती अभियानात सहभागी होऊन लोकांना मतदानासाठी प्रवृत्त केले पाहिजे तसेच मतदार नोंदणी वाढवली पाहिजे.यावेळी कार्यक्रम अधिकारी प्रा.जे.डी. मुळीक यांनी शपथ वाचन केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक कार्यक्रमाधिकारी प्रा.उत्तम सावंत यांनी केले तर आभार प्रा.डॉ. सुनिता सूर्यवंशी यांनी मानले. सदर कार्यक्रमासप्रा. डॉ.बी.टी.निकम, प्रा.डॉ.डी.एम. साळवे,प्रा.वैभव गवळी,प्रा.सौ नलिनी वाघ,प्रा. कु.कदम, प्रा. अनिल घेमाड, ग्रंथपाल प्रा.दिलीप शिंदे, एच.टी.वाघमोडे, नागराज करपे,शिक्षकेतर कर्मचारी व महाविद्यालयीन विद्यार्थी उपस्थित होते.

# धमार्दाय आयुक्तालय पुणे तर्फे गायक मोहंम्मद अयाज यांना मानपत्र



**सोलापूर (कटूसत्य वृत्त)**:- चॅरिटी प्रिमियम लीग २०२५ - सांस्कृतिक व क्रीडा महोत्सवाच्या कार्यक्रमात धमार्दाय आयुक्तालय पुणे तर्फे महाराष्ट्राचे महागायक मोहंम्मद अयाज यांना मानपत्र देऊन सन्मानित करण्यात आलं हा मानपत्र सन्माननीय रजनी क्षिरसागर धमार्दाय सह आयुक्त पुणे व सन्माननीय संभाजी ठाकरे साहेब ( धमार्दाय सह आयुक्त अमरावती ) यांच्या शुभहस्ते प्रदान करण्यात आला . या वेळी पुणे धमार्दाय चे उप आयुक्त माननीय डॉ राजेश परदेशी साहेब तसेच धमार्दाय पुणे चे सहाय्यक आयुक्त मा . रेश्मा पुनसे , मा. पी पी चव्हाण , मा. राहुल मामु सह एम आय टी युनिव्हर्सिटी पुणे चे सन्माननिय अतिथी गण उपस्थित होते. या कार्यक्रमात मुंबई पुणे सह महाराष्ट्र भरातुन अधिकारी वर्ग आपली उपस्थिती दर्शविली हा कार्यक्रम शनिवारी दिनांक १८ रोजी लोणी काळभोर पुणे येथील एम आय टी युनिव्हर्सिटी च्या डोम समोरच्या प्रांगणात पार पडला . डोळ्याचे पारणे फेडणारे असा हा भव्य सांस्कृतिक कार्यक्रमात मोहंम्मद अयाज यांनी एका हुन एक सरस गीते गाऊन समस्त धमार्दाय आयुक्तालय पुणे यांना भाराऊन टाकले या वेळी गायक मोहंम्मद अयाज यांनी एम आय टी चे संस्थापक चेअरमन माननीय प्रैफेसर डॉ मंगेश कराड साहेब आणी महाराष्ट्राचे धमार्दाय आयुक्त सन्माननीय अमोग कलोटी साहेब यांचा मी सदैव ऋणी आहे हा सन्मान माझा नसुन माज्यावर व माज्या कलेवर प्रेम करणारे रसिक श्रोत्यांना अर्पण करत आहे असे प्रतिपादन केले मोहम्मद अयाज यांनी केले .

# लोकमंगल कृषीजैवतंत्रज्ञान महाविद्यालयात नेताजी सुभाषचंद्र बोस यांना अभिवादन

**सोलापूर,(कटूसत्य वृत्त)**:- श्रीराम ग्रामीण संशोधन व विकास प्रतिष्ठान संचलित लोकमंगल कृषी जैवतंत्रज्ञान महाविद्यालय वडाळा येथे राष्ट्रीय सेवा योजना एकका अंतर्गत नेताजी सुभाषचंद्र बोस यांची 128 वी जयंती साजरी करण्यात आली. या कार्यक्रमास महाविद्यालयाचे प्राचार्य सागर महाजन अध्यक्षस्थानी उपस्थित होते. कार्यक्रमाच्या प्रारंभी उपस्थित मान्यवरांच्या हस्ते नेताजी सुभाष चंद्र बोस यांच्या प्रतिमेला पुष्पहार व दीप प्रज्वलन करून अभिवादन करण्यात आले. यानंतर महाविद्यालयातील विद्यार्थी गणेश शिंदे, तृप्ती जाधवर, साहिल शेख, मंदार खराडे, संघमित्रा शिंदे व प्रसाद नेटके यांनी आपल्या मनोगतातून सुभाषचंद्र बोस यांचा भारतीय स्वातंत्र्य लढ्यातील जीवन प्रवास व्यक्त केला. कार्यक्रमाचे अध्यक्ष सागर महाजन यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना सांगितले की सुभाषचंद्र बोस यांनी ज्याप्रमाणे जीवाची पर्वा न करता भारतमातेला स्वातंत्र्य मिळवून देण्यासाठी सातत्य प्रयत्न केले. त्याप्रमाणे आपणही त्यांचे योगदान स्मरणात ठेवून देशभक्तीची प्रेरणा घेऊन कार्य केले पाहिजे. तसेच प्रा. आशिष सरकाळे यांनी विद्यार्थ्यांना नेताजी सुभाषचंद्र बोस यांचा जीवनप्रवास थोडक्यात व्यक्त केला. त्यांनी विद्यार्थ्यांना सांगितले की नेताजी सुभाषचंद्र बोस यांनी अवघ्या पंधरा वर्षाच्या वयातच स्वामी विवेकानंद यांचे साहित्य वाचून काढले व त्यातून प्रेरणा घेऊन स्वतःला देशाच्या स्वातंत्र्यासाठी झोकून दिले. नेताजी सुभाषचंद्र बोस यांचा जीवनप्रवास अतिशय खडतर व संघर्षमय होता. सुभाषचंद्र बोस यांनी ४० हजार भारतीय स्त्री व पुरुषांना प्रशिक्षित करून आझाद हिंद सेनेत सहभागी करून घेतले व आझाद हिंद फौजेची स्थापना केली. याच आझाद हिंद फौजेने भारतीय स्वातंत्र्य लढ्यात महत्वाची भूमिका बजावली. आजच्या युवा पिढीमध्ये सुभाषचंद्र बोस यांचे आचार-विचार जागृत होणे गरजेचे आहे. याप्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य सागर महाजन, प्रा. आशिष सरकाळे, प्रा.सायली बडेकर, प्रा.वर्षा माने देशमुख, प्रा.अंकिता पवार व सर्व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सोनाली उन्हाळे यांनी व आभार प्रदर्शन गुरुदेव घाडगे यांनी व्यक्त केले. महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी कार्यक्रमास उपस्थित राहून कार्यक्रमाची शोभा वाढवली. अशाप्रकारे नेताजी सुभाषचंद्र बोस यांची जयंती उत्साहात पार पाडली.

# तडवळेच्या सरपंचपदी रंजना परबत

**माढा (कटूसत्य वृत्त)**:- माढा तालुक्यातील व करमाळा विधानसभा मतदारसंघातील तडवळे (म) ग्रामपंचायतीच्या सरपंचपदी रंजना सिद्धेश्वर परबत यांची बिनविरोध निवड झाली.

यांनी सरपंच पदाचा राजीनामा दिला होता.त्यांच्या राजीनाम्यामुळे रिक्त झालेल्या सरपंच पदासाठी २२ जानेवारी रोजी तडवळे ग्रामपंचायत कार्यालयात निवडणूक घेण्यात आली.यावेळी सरपंच पदासाठी संजयमामा शिंदे गटाच्या रंजना सिद्धेश्वर परबत यांचा एकमेव उमेदवारी अर्ज आल्याने निवडणूक निर्णय अधिकारी सुर्यकांत डिकोळे यांनी रंजना परबत यांची बिनविरोध निवड जाहीर केली. यावेळी तलाठी प्रतिक्षा वाघमारे ग्रामसेवक मजहर महमद मुलाणी,



स्मृतिषेश शोभा विश्वनाथ परबत या ग्रामपंचायत सदस्य असताना त्यांना सरपंच पदाची संधी मिळणार होती पण त्या दरम्यान त्यांचे एका रस्ते अपघातात दुर्दैवी निधन झाल्यानंतर ती संधी त्यांच्या जाऊबाई रंजना सिद्धेश्वर परबत यांना मिळाल्याने या निवडीबद्दल ग्रामस्थांनी समाधान व्यक्त केले.

उपसरपंच महेंद्र शहाजी पाटील, ग्रामपंचायत सदस्य शिवानी गिरी, सारिका परबत, कमल गोसावी, प्रभावती लोंढे, अशोक वाघमारे यांच्यासह ग्रामपंचायतीचे आजी, माजी पदाधिकारी, सोसायटीचे पदाधिकारी व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

ग्रामस्थांनी आपल्यावर दाखविलेल्या विश्वासाला तडा जाऊ न देता स्मृतीशेष शोभाआई विश्वनाथ परबत यांच्या विचारांना अनुसरून गावाच्या विकासासाठी व विशेषतः महिलांचे प्रश्न सोडविण्यासाठी प्रयत्न करेन अशी प्रतिक्रिया यावेळी नवनिर्वाचित सरपंच रंजना परबत यांनी दिली आहे. यावेळी उपस्थितांनी सरपंच पदी निवड झाल्याबद्दल रंजना परबत यांच्यासह पार्टीप्रमुख विश्वनाथ परबत यांचे अभिनंदन करून पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

# एमआयडीसीचे स्वप्न लवकरच पूर्ण होणार- राम सातपुते

**माळशिरस (कटूसत्य वृत्त)**:- गेल्या अनेक वषार्पासून माळशिरस तालुक्यातील, एमआयडीसीचे स्वप्न अपूर्ण असून,तालुक्यातील तरुणांना तालुक्यातच रोजगार उपलब्ध व्हावा त्यांना रोजगारासाठी शहराच्या ठिकाणी जाऊ लागू नये, यासाठी माळशिरस तालुक्यात लवकरच अद्यावत एमआयडीसी उभी राहणार आहे.असे पत्रकारांशी बोलताना माजी आमदार राम सातपुते म्हणाले. पुढे बोलताना सातपुते म्हणाले की , या संदर्भात राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व उद्योग मंत्री ना उदय सावंत यांच्याशी सकारात्मक चर्चा झाली आहे.त्यामुळे लवकरच माळशिरस तालुक्यात एमआयडीसी होणार आहे तर निरा उजव्या कालव्यापासून वंचित असलेल्या तालुक्यातील 22 गावांना निरादेवघरचे पाणी लवकरच उपलब्ध होणार असल्याची माहितीही माझी आमदार राम सातपुते यांनी पत्रकारांना दिली . तालुक्यात एमआयडीसी व्हावी यासाठी सातत्याने प्रयत्न सुरू होते. पण या प्रयत्नांना आज अखेर मुर्त स्वरूप मिळत असून,माळशिरस तालुक्यात एमआयडीसी व्हावी यासाठी दोन ते तीन ठिकाणच्या जागेची पाहणी झाली आहे.



## Classified - छोटी जाहीरात

**निर्मल व्यसनमुक्ती केंद्र**

**मानसिक आजार, व्यसनमुक्ती, लैंगिक समस्या** स्किझोफ्रेनिया, बायपोलार मुड डिसऑर्डर, उन्माद, डिप्रेशन, ओ. सी. डी, मंत्रचळेपणा इ. मानसिक आजारासाठी, दारू, तंबाखु, सिगारेट, गुटखा, मावा, गांजा, भांग, मिश्री इ. व्यसनमुक्तीसाठी, शीघ्रपतन, नपुसकता, वीर्यनाश, हस्तमैथुनामुळे कमजोरी इ. लैंगिक समस्यांसाठी वृद्ध लोकांना सांभाळण्यासाठी सुश्रुषा केंद्र व नातेवाईकांशिवाय अँडमीट करण्याची सोय **निर्मल व्यसनमुक्ती पुनर्वसन व सुश्रुषा केंद्र, स्टेशन रोड, मिरज.**

-: संपर्क :-
8083608083
9922646566
8698732109

(सरकार मान्य)

**अथर्व पेस्ट कंट्रोल**

An ISO 9001-15 सर्टीफाईड कंपनी

**प्रोप्रा. हरी सुभाष विरपे**

9822964815
9421984815

झुरळ, पाल, मुंगी, वाळवी, डास, जाळी, माशी, ढेकुण, उंदीर, घुस इ. नियंत्रण

**विकणे आहे**

सोलापूर शहरातील चांगल्या लोकवस्तीतील ST स्टॅन्ड व रेल्वे स्टेशन जवळ आवंतीनगर, शरद पवार शाळेजवळ, लोकमंगल ऑक्सिपार्क, येथील अ विंग मधील ७०४ नंबरचा फ्लॅट विकणे आहे.

**संपर्कः** 9881361260

|| श्री अक्कलकोट प्रसन्न ||

**R.K कन्स्ट्रक्शन्स्**

इन्फ्रास्ट्रक्चर, इंडस्ट्रीज, अपार्टमेंट यामध्ये सर्व सल्ल्याबाबत तत्पर...



* बांधकाम नकाशा
* इंटेरियर डिझाईन
* 3 D डिझाईन
* कॉन्ट्रॅक्टर वर्क्स
* बांधकाम परवाना
* स्टील डिझाईन
* इस्टिमेट
* साईट सुपरव्हिजन
* ब्लु प्रिंटस्
* लेव्हल सर्व्हिसेस

संपर्क पत्ता :- इंजि. स्वप्निल पोपट कदम M.E. (Structure) B.E. (Civil)

Mo. 9552547272, 8788832033



**नका कॅन्सरला आमंत्रण देऊ...**

दारू... अंमली पदार्थ... गॅरंटेड सुटण्यासाठी...



व्यसन + टेन्शन + भिती + चिंता + नैराश्य + हस्तकंप + निद्रानाश ..

(महाराष्ट्राचे पसंतदिदा नशामुक्ती सेंटर)

**डॉ. पालवे नशामुक्ती केंद्र**


फोन: 9552619752

कॉल / व्हॉटस्ॲप करा...
दारू... अंमली पदार्थ...
राम राम करा...

501% रिझल्ट

**वाचकांसाठी निवेदन**: या अंकात प्रसिद्ध होणाऱ्या सर्व प्रकारच्या जाहिरातीमधील मजकूर जाहिरातदाराने दिल्यानुसार प्रसिद्ध केला जातो. यातील कोणत्याही माहितीच्या अथवा आहवानाच्या सत्यतेबाबत दैनिक कटूसत्य हमी घेऊ शकत नाही याची कृपया नोंद वाचकांनी घ्यावी.

## कटूसत्य शब्दकोडे



**उभे शब्द :** १) ख्रिश्चन धर्मियांचा एक सण, ख्रिसमस २) डोके ३) गुणी, प्रामाणिक वृत्तीचा ४) दह्यात पाणी मिसळून हे तयार करतात ५) जेवणासाठी बसलेली रांग ६) हात ८) एक पक्षी ९) आश्चर्य १०) नगरचे माजी खासदार- *** विखे-पाटील ११) एक भारतीय गोलंदाज-यजुवेंद्र *** १२) शर्ट १३) इच्छा १४) दिलेले आश्वासन, वचन १५) लहान मूल १६) एक मराठी अभिनेत्री-*** प्रभुणे १७) वेडसर (हिंदीत) १८) शर्टची गळ्याभोवतीची पट्टी १९) धावपट्टू (इंग्रजीत) २१) पावसाची आतुरतेने वाट पाहणारा पक्षी २२) वस्तूंवर लावलेला टॅक्स, कर २३) कंबर (हिंदीत) २४) आत, आतील बाजूस (हिंदीत) २५) जवळ, समीप २६) खोलगट २७) काजूच्या जोडीचा एक पौष्टीक पदार्थ २८) दोन आणि अर्धा २९) शिवसेनेचे मुखपत्र ३०) पोट ३१) वायू, वारा ३२) कर्मवीर भाऊराव पाटील यांनी स्थापन केलेली शिक्षणसंस्था ३४) शपथ (हिंदीत) ३५) मनुष्य ३६) शंभर धावांचा टप्पा ३७) गाडीची गती ३८) गुलाम ३९) मनी नाही ** अन् देवा मला पाव

**आडवे शब्द :** १) उत्तर महाराष्ट्रातील एक जिल्हा ३) खा. उदयनराजे यांचा लोकसभा मतदारसंघ ५) बीडच्या एक नेत्या-*** मुंडे ७) वायर, धातूचा तंतू ८) लहान मुलाचा सांभाळ करणारे आई वडील, एक भाजी प्रकार ९) छोटे शहर ११) एक अंमली नशिला पदार्थ १२) पतीची दुसरी बायको १३) शर्टला बटण अडकविण्यासाठी केलेली खाच १४) स्तुती १५) ढग (हिंदीत) १६) वेळ (हिंदीत) १७) पैंजण (हिंदीत) १८) पूर्वीचा एक साथीचा रोग १९) एक अभिनेत्री-*** टंडन २०) हनुमानाच्या हातातील शस्त्र २१) वाहन चालविणारा २२) लालू प्रसाद यादव यांचा पक्ष-राष्ट्रीय *** दल २४) दोन्हीमधील तफावत २५) होकारच्या विरूध्दार्थी २६) विषमच्या विरूध्दार्थी २७) पाण्यावर तरंगणारा एक पक्षी २८) महाराष्ट्राचे एक नेते -*** पवार २९) शुगर, शर्करा ३०) मोठ्या मनाचा ३१) पडून राहिलेली जमीन ३२) वाळूवर रेषा काढून भविष्य जाणण्याची पध्दत ३३) धमकी देणे, संयम, धीर ३४) संरक्षक आवरण ३५) पत्राचा सुरूवातीचा मजकूर ३७) बैलाच्या नाकात घातलेली दोरी ३८) दान करण्याची वृत्ती ३९) शिजवलेला तांदूळ ४०) दोन नद्यांचा मिलाफ ४१) ससाची आणि याची शर्यतीची गोष्ट प्रसिध्द आहे ४२) जावकच्या विरूध्दार्थी शब्द

## सुडोकु - 157

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | 5 | 8 | 7 | 1 | | 9 | |
| | | | | 4 | | | | |
| 8 | 9 | 1 | | | 6 | 7 | | |
| 4 | | 9 | 1 | 3 | | | | 5 |
| | 6 | | | 9 | 8 | | 7 | 4 |
| 5 | 3 | 8 | 7 | | | 1 | | |
| | | 3 | | 2 | | 6 | 5 | 8 |
| 2 | | | | 8 | | | | 7 |
| | 8 | 7 | | | 5 | | | 2 |

